CMYK

उर्ध्व पैनगंगा कालव्यातून १ डिसेंबर पासून सिंचनाखाली >> पान 2

अपूर्ण कामे दोन महिन्यात पूर्ण होतील : उदय सामंत >> पान 3

प्रदीपजी मिश्रा यांच्या कथा स्थळाची पोलीस उपअधीक्षकांकडून पाहणी >> पान 4

**सुविचार**

समर्पण आणि संयम यशाचे रहस्य आहे.


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 108 ■ गुरूवार, दि. 28 नोव्हेंबर 2024 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006




मोठ्या लेकाची लगीनसराई सुरु असतानाच धाकट्या लेकानेही उरकला साखरपुडा, नागार्जुनच्या धाकट्या सुनेला पहिलंत का?

आतील पान

# महाराष्ट्रात भाजपचा मुख्यमंत्री होण्याचे संकेत

## जो निर्णय पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमित शाह घेतील तो आम्हाला मान्य : एकनाथ शिंदे



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी : राज्यात विधानसभा निवडणुकीनंतर आता मुख्यमंत्री पदासाठी रस्सीखेच सुरू असल्याचं दिसून येत आहे. अशातच मुख्यमंत्री पदासाठी भाजप नेते देवेंद्र फडणवीस प्रबळ दावेदार मानले जात आहेत. अशातच मुख्यमंत्री पदावरून एकनाथ शिंदे हे नाराज असल्याच्या चर्चा होत्या. त्यानंतर आज त्यांनी मुंबईत आपल्या ठाण्यातील निवासस्थानी पत्रकार परिषद घेऊन आपली नाराजीबाबतची भूमिका स्पष्ट केली आहे. तुम्हाला वाटत असेल कुठे घोडं अडलं. मी मोकळा माणूस आहे. मी धरून ठेवणं, ताणून ठेवणं असा माणूस नाही. जो निर्णय पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमित शाह घेतील तो आम्हाला मान्य आहे, असं शिंदेंनी म्हटलं. त्यानंतर आता भाजपाचा मुख्यमंत्री असणार असे संकेत दिसू लागले आहेत.**

तुम्हाला वाटत असेल कुठं घोडं अडलं आहे. मी मोकळा माणूस आहे. मी धरून ठेवणं, ताणून ठेवणं असा माणूस नाही. मी लाडका भाऊ हे पद मिळवलं आहे. ही मोठी ओळख आहे. काल मी मोदींना फोन केला होता. मी त्यांना सांगितलं सरकार बनवताना निर्णय घेताना मी कुठलीही अडचण आणणार नाही. मला अडीच वर्ष संधी दिली. आता तुम्ही निर्णय घ्या, तुमचा निर्णय आम्हाला मान्य असेल. एनडीए आणि महायुतीचे प्रमुख म्हणून तुम्ही घेतलेला निर्णय पक्षातील अंतिम असेल. तसा आम्हालाही अंतिम असेल. निर्णय घेताना माझी अडचण आहे असं वाटू देऊ नका. तुम्हाला जो निर्णय घ्यायचा तो घ्या. मला मान्य असेल, असं मी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह यांना फोनवरून हे सांगितलं असल्यातं शिंदे यांनी म्हटलं आहे.

लाडक्या बहिणींचा लाडका सख्खा भाऊ म्हणून माझी ओळख निर्माण झाल्याचे वक्तव्य एकनाथ शिंदे यांनी केलं. ही ओळख सर्व पदापेक्षा मोठी वाटते. मी समाधानी आहे. नाराज होऊन रडणार नाही, लढून काम करणार असल्याचे एकनाथ शिंदे म्हणाले.

आज पत्रकार परिषदेत बोलताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, 'मी माझ्या अंगातील रक्ताचा शेवटचा थेंब असेपर्यंत महाराष्ट्राच्या जनतेसाठी काम करत राहील. पंतप्रधान नरेंद्र मोदींना फोनवर बोलताना सांगितलं आहे. एनडीएचे प्रमुख म्हणून तुम्ही जो निर्णय घ्याल, तो मला मान्य असेल. मी गृहमंत्री अमित शाह यांना देखील फोन करुन तुमचा जो निर्णय होईल, ते मान्य असल्याचे एकनाथ शिंदेंनी पत्रकार परिषदेत सांगितलं आहे. त्यामुळे आता भाजपचा मुख्यमंत्री पदाचा मार्ग मोकळा झाला आहे. त्यामुळे आता देवेंद्र फडणवीसांच्या नावावर शिक्कामोर्तब होईल अशी शक्यता वर्तवली जात आहे.

## एकनाथ शिंदे यांना पुन्हा मुख्यमंत्री करण्यासाठी शिवसैनिकांचे विठ्ठलाला साकडे

दैनिक आपला विदर्भ

**पंढरपूर/प्रतिनिधी** : एकनाथ शिंदे पुन्हा मुख्यमंत्री व्हावे,यासाठी पंढरपुरातील शिवसेना शहर प्रमुख (शिंदे गट) विश्र्वजीत भोसले यांच्यासह शिवसेना पदाधिकाऱ्यांकडून विठ्ठलाची महाआरती करून साकडे घालण्यात आले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यामुळे महायुतीला यश आले आहे. महायुतीने एकनाथ शिंदे आणि लाडकी बहिण योजना समोर ठेऊन निवडणूक लढवली असून महायुतीला यश आले आहे. आता एकनाथ शिंदे मुख्यमंत्री पुन्हा मुख्यमंत्री व्हावे,यासाठी पंढरपूर येथील शिवसैनिकांच्या वतीने विठ्ठलाला साकडे घातले आहे, अशी माहिती शिवसेना शहर प्रमुख (शिंदे गट) विश्वजीत भोसले माध्यमांशी बोलताना दिली.

## निकालाबाबत अनेक ठिकाणाहून तक्रारी येत आहेत; अमित देशमुख यांनी निकालाबाबत व्यक्त केली शंका

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : निकाल खुपच धक्कादायक आहेत अनेक ठिकाणाहून तक्रारी येत आहेत. असे बोलून आमदार अमित देशमुख यांनी माध्यमांशी बोलताना निकालाबाबत मत व्यक्त केले. यावेळी ते पुढे म्हणाले की, विधानसभेच्या निकाला संदर्भात बैठक आहे.महाविकास आघाडीतील सगळेच पक्ष या निकालाचा आढावा घेत आहेत. तो आढावा खोलवर घेतल्या शिवाय त्यावर टिपणी करणे योग्य नाहीये, निकाल खुपच धक्कादायक आहेत. अनेक ठिकाणाहून तक्रारी येत आहेत. महाराष्ट्राच नाही तर देशभरात निकालाची चर्चा सुरु आहे. सगळ्यांना वाटले महाविकास आघाडी यावेळी सत्तेत येईल, मात्र झाले वेगळेच आहे. अनेकांनी ईव्हीएम वर शंका घेतली आहे. शंका आहे पण ईव्हीएम बद्दल आता सत्ताधारींच बोलू शकतात. ही वैचारिक लढाई आहे. अशोकराव चव्हाण यांच्या विचारांची मला कीव येते. असे काँग्रेसचे आमदार अमित देशमुख म्हणाले.

## निकालावर तीन पक्ष मिळून चर्चा करु आमदार विकास ठाकरे यांची माहिती

**मुंबई/प्रतिनिधी** :निवडणुकीच्या निकालात कोणाच नुकसान झाले कोणाचा फायदा झाला त्याची तीन पक्ष मिळून चर्चा करु विकास ठाकरे अशी माहिती आमदार विकास ठाकरे यांनी माध्यमांशी बोलताना दिली. यावेळी ते पुढे म्हणाले की, स्वबलावर लढण्याबाबत पत्रकारांनी पश्र्न केला असता त्यांनी प्रत्येकाचे आता वेगवेगळ मत आहे. नेत्यांना त्याचे व्यक्तीगत मत मांडण्याचा अधिकार आहे.विधानसभा निवडणुकीत जे काही घडले त्यावर चर्चा करण्यासाठी ही बैठक आहे. विदर्भात जो काही लोकसभेचा निकाला लागला आणि विदर्भातील जनतेने काँग्रेसला भरभरुन मत दिले आणि अवघ्या तीन महिन्यात असे काय झाले त्यावर चर्चा करु, यात कोणाच नुकसान झाले कोणाचा फायदा झाला त्याची तीन पक्ष चर्चा करु, अशी माहिती आमदार विकास ठाकरे यांनी दिली.

## हरित क्रांतीतील स्वामिनाथन यांच्या प्रमाणेच जैवइंधन क्रांतीत प्रमोद चौधरींचे मोठे योगदान! गडकरी यांचे गौरवोद्गार

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी** : जैवइंधनातील प्रगतीमुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळणार आहे. यातून गावे सशक्त होणार असून, ग्रामीण भागातून शहरात स्थलांतर करण्याचे प्रमाण कमी होईल. देशात हरित क्रांतीत एम.एस.स्वामिनाथन यांचे योगदान मोठे होते. आता कृषी क्षेत्रात जैवइंधन क्रांती सुरू असून, त्यात डॉ. प्रमोद चौधरी यांनी मोठे योगदान दिले आहे, असे गौरवोद्गार केंद्रीय परिवहन व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी मंगळवारी काढले.

प्राज इंडस्ट्रीजचे कार्यकारी अध्यक्ष डॉ. प्रमोद चौधरी यांच्या पंचाहत्तरीनिमित्त आयोजित सत्कार कार्यक्रमात गडकरी यांनी दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून भाषण केले. यावेळी ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर, सिम्बायोयिसचे संस्थापक डॉ. शां. ब. मुजुमदार, फोर्स मोटर्सचे अध्यक्ष डॉ. अभय फिरोदिया, पर्सिस्टंट सिस्टिम्सचे संस्थापक डॉ. आनंद देशपांडे, प्राजचे व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी शिशिर जोशीपुरा आणि अध्यक्ष अतुल मुळे आदी उपस्थित होते.

गडकरी म्हणाले की, जैवइंधनाच्या माध्यमातून मोठे सामाजिक-आर्थिक स्थित्यंतर होणार आहे. जैवइंधन विकसित करण्यात प्रमोद चौधरी यांच्या संशोधनाचा मोलाचा वाटा आहे. जैवइंधनाचा कृषी अर्थव्यवस्थेवर मोठा परिणाम होणार आहे. इथेनॉल निर्मितीमुळे आत्मनिर्भर भारताच्या दिशेने आपण वाटचाल करणार आहोत. भविष्यात खनिज तेलाची आयात कमी करून आपण आत्मनिर्भर बनण्यात यशस्वी होऊ. आगामी काळात चौधरी यांनी जैवइंधन क्षेत्रात असेच सकारात्मकरीत्या कार्यरत राहावे आणि देशाला मार्गदर्शन करावे.



यावेळी बोलताना डॉ. माशेलकर, डॉ. मुजुमदार आणि डॉ. फिरोदिया यांनी डॉ. चौधरी यांच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू उलगडून दाखविले. आनंद देशपांडे यांनी चौधरी यांच्या सुरुवातीच्या टप्प्यातील कार्यकर्तृत्वाचा आढावा घेतला. कार्यक्रमात राज्यातील साखर उद्योगाच्या वतीने श्रीनाथ म्हस्कोबा साखर कारखान्याच्या वतीने चौधरी यांचा मानपत्र देऊन सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जोशीपुरा यांनी केले तर आभार मुळे यांनी मानले.

जैवअर्थव्यवस्थेचे अवकाश खुले होतेयष्ठ

सत्काराला उत्तर देताना डॉ. प्रमोद चौधरी म्हणाले की, आताशी कुठे जैवअर्थव्यवस्था खुली होत आहे. या क्षेत्रासमोर खुले अवकाश आहे. संशोधन आणि विकासाच्या माध्यमातून विविध गोष्टींवर काम करता येईल. या क्षेत्रातील नवीन कल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी प्रयत्न करताना प्राजमधील बुद्धिमान सहकाऱ्यांनी मला पाठबळ दिले. त्याचे एकत्रित फलित आता प्राजच्या रूपाने पाहायला मिळत आहे.

## मतपत्रिकेवर निवडणुका घेण्यासाठी प्रदेश काँग्रेसची राज्यव्यापी सह्यांची मोहिम

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : महाराष्ट्र विधानसभेच्या निकालावर कोणाचाही विश्वास बसत नाही. या निकालात काहीतरी गडबड असल्याची भावना सर्व स्तरातून व्यक्त होत आहे. संविधानाने सर्वांना मतदानाचा अधिकार दिलेला आहे पण आपण एकाला दिलेले मत दुसऱ्यालाच जात असल्याची भावना जनतेत आहे. जनतेच्या भावनांचा आदर करत मतपत्रिकेवर निवडणुका घ्याव्यात या मागणीसाठी काँग्रेस पक्ष राज्यभर सह्यांची मोहिम सुरु करणार आहे. महामहीम राष्ट्रपती, पंतप्रधान, सरन्यायाधीश व निवडणूक आयोग यांच्याकडे हे अर्ज पाठवण्यात येतील, अशी माहिती महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी दिली आहे.



टिळक भवन येथे काँग्रेस पक्षाच्या नवनिर्वाचीत आमदारांची बैठक पार पडली. या बैठकीला प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, काँग्रेस वर्किंग कमिटीचे सदस्य बाळासाहेब थोरात, विजय वडेट्टीवार, प्रदेश कार्याध्यक्ष व ऍण सदस्य नसीम खान, मुजफ्फर हुसेन, कुणाल पाटील, डॉ. नितीन राऊत, अमित देशमुख, अस्लम शेख, अमिन पटेल, नांदेडचे नवनिर्वाचीत खासदार रविंद्र चव्हाण, मा. खा. कुमार केतकर, प्रदेश उपाध्यक्ष संघटन व प्रशासन नाना गावंडे, प्रदेश सरचिटणीस प्रमोद मोरे यांच्यासह आमदार उपस्थित होते.

या बैठकीनंतर पत्रकार परिषदेत बोलताना नाना पटोले म्हणाले की, मतपत्रिकेवर निवडणुका घेण्यासाठी जनआंदोलन उभे करण्याची घोषणा काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जून खर्गे यांनी संविधानदिनी दिल्लीत झालेल्या कार्यक्रमात केली आहे. महाराष्ट्रात लवकरच या मागणीसाठी सह्यांची मोहीम सुरु केली जाणार आहे. जनतेच्या सह्यांचे लाखो अर्ज राष्ट्रपती, पंतप्रधान, सरन्यायाधीश, व निवडणूक आयोगाला पाठवले जाणार आहेत. भारत जोडो यात्रेला महाराष्ट्रात ऐतिहासीक प्रतिसाद मिळाला होता आता पुन्हा राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली मतपत्रिकेवर निवडणुका घेण्यासाठी यात्रा काढली जाणार आहे, या यात्रेलाही महाराष्ट्रात प्रचंड प्रतिसाद मिळेल. लोकशाही वाचवणे ही सर्वांची जबाबदारी आहे. काँग्रेस पक्षाने स्वातंत्र्याची लढाई लढलेली आहे, जनभावना तीव्र झाल्यानंतर १५० वर्षांची ब्रिटिश सत्ता संपुष्टात आली हा इतिहास आहे. लोकशाही व्यवस्थेत जनताच सर्वोच्च असून जनभावनेचा आवाज काँग्रेस उठवत आहे, असे नाना पटोले म्हणाले.





# पराभव झाला की तो ईव्हीएमच्या माथी मारतात

## राष्ट्रवादी काँग्रेसेच गटनेते अजित पवार यांची विरोधकांवर टिका

दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी** : विधानसभा निवडणुकीचा २३ नोव्हेंबरला निकाल लागला आहे. महाराष्ट्र ने एकतर्फी निकाल दिला आहे. महाराष्ट्रने आजपर्यंत कधीच असा निकाल दिला नव्हता. काँग्रेसचा विक्रम मोडला गेला, त्याबद्दल सर्वांचे आभार. आता आमच्यावर जवाबदारी वाढली आहे. असे सांगून राष्ट्रवादी काँग्रेसेच गटनेते अजित पवार यांनी पराभव झाला की, तो सगळे ईव्हीएमच्या माथी मारतात, असा टोला विरोधकांना लगावला. छत्रपती संभाजीनगर येथे माध्यमांशी बोलताना राष्ट्रवादी काँग्रेसेच गटनेते अजित पवार म्हणाले की, उद्या मी, फडणवीस, शिंदे आणि दिल्लीला जाणार आहोत, दिल्लीला गेल्यानंतर आमची पुढची चर्चा होणार आहे. त्यानंतर नवीन मुख्यमंत्री, दोन उपमुख्यमंत्री असे सरकार स्थापन होईल. नागपूरला अधिवेशन आहे, पुरवण्या मागण्या मान्य कराव्या लागतील. कामाच प्रेशर राहणार आहे. आमचा अनुभव असल्यामुळे अडचणी येतील असे मला वाटत नाही. सर्व समाजाला सोबत नेण्याचा प्रयत्न करणार आहे.उद्या दिल्लीला गेल्यानंतर लोकसभेचे अधिवेशन सुरू असल्यामुळे मी प्रमुखांना पण भेटणार आहेत. खेळीमेळीच वातावरणात महायुतीच्या सरकार स्थापन होईल. उद्या आमची दिलेला मिटींग आहे. त्या मीटिंगमध्ये जे ठरेल त्याला सगळ्यांची मान्यता असेल. एकनाथ शिंदे यांनी काय करावे त्यांच्या वाट्याला किती जागा येतील किती पदे येतील त्याबाबत सर्व अधिकार एकनाथ शिंदे यांना आहे. आमच्या बाजुचा निर्णय आम्ही घेऊ त्यांच्या बाबतीतचा निर्णय मी कसा सांगणार? असा प्रश्र्नही माध्यमांसमोर बोलताना पवार यांनी केला. कार्यकर्त्यांना काही जरी वाटत असले तरी प्रत्येकाची संख्या किती आली? किती लोक निवडून आले हे पाहिले जाते. मागच्या अडीच वर्षांपूर्वीची गोष्ट वेगळी होती आत्ताची परिस्थिती वेगळी आहे. आपण सगळेच संविधानाला मानतो. सुप्रीम कोर्टाने सांगितले ते आपण ऐकले. प्रत्येक वेळेस निवडणुकीत ज्यांचा पराभव होतो तो ईव्हीएमच्या माथी मारला जातो. मात्र यश आले तर ईव्हीएम चांगले असे म्हणतात. लोकसभेच्या निवडणुकीच्या निमित्ताने महायुतीचा खराब परफॉर्मन्स होता परंतु आम्ही त्याचा ईव्हीएमचा दोष दिला नाही. ईव्हीएम आज नाही वर्षांनुवर्ष सुरू आहे. काय आहे स्वतःच्या कार्यकर्त्यांचे मनोबल वाढवण्यासाठी हा त्यासाठी केलेला प्रयत्न आहे. पश्र्चिम बंगालमध्ये, दिल्ली, कर्नाटक, केरळ, तेलंगाना तेव्हा ईव्हीएम सुंदर आणि फर्स्ट क्लास वाटले. निकाल विरोधात गेला तर विरोधात बोलतात. २०१४ ला मोदींची लाट आली तेव्हा पण ईव्हीएमला विरोध केला. २०१९ मध्ये देखील तसंच झालं. मात्र २०२४ च्या निवडणुकीत विरोधकांच्या जागा आल्या तेव्हा विरोधात वक्तव्य केले नाही. हे काही एका दिवसात घडत नसते. ईव्हीएम मशीन बद्दल कोणत्याही देशाचे दाखले द्यायचे, मात्र अमेरिकेत ट्रम्प गेल्या वेळेस पडले होते. मात्र जनतेच्या मनात असत ते होत असते. राज ठाकरे, उद्धव ठाकरे ईव्हीएम विरोधात येणार आहे. किती आंदोलन केले तरी हा सर्वोच्च न्यायालयाचा निकाल आहे. आपण सुप्रीम कोर्टाला ते देतील तो निर्णय अंतिम असतो. या लोकांचे दारून पराभव झाला आहे हे पराभव कसे सांगायचे म्हणून कोणाच्यातरी माथी मारत आहेत.कोणाला काय करायचे हा त्यांचा अधिकार आहे. तर नव्या सरकारचा शपथविधी महिन्याच्या शेवटी तीस तारखेपर्यंत व्हायला पाहिजे,असे मतही त्यांनी व्यक्त केले. आत्ताच दादांना मुख्यमंत्री करा रोहित पवार असे म्हणाले बाकीच्यांनी फुकटचा सल्ला द्यायची गरज नाही. आम्ही आणि आमचा पक्ष आमदार कार्यकर्ते थांबलेले आहेत. निकाल लागून अजून तीन दिवस झाले असून अजून कशातच काही नाही. मात्र काही पण बातम्या पसरवण्याचा प्रयत्न केला जात आहे. माझ्या संपर्कात कोणीही नाही निवडून आलेल्या आमदारांचे बैठक घेतली त्यात आमच्या पराभूत आमदारांचा देखील समावेश होता त्यांचे मन जाणून घेतलं निवडून आलेल्या आमदारांना सांगितले मतदार संघात जाऊन जनतेच्या आभार मानायचं सांगितले. राज ठाकरे व उद्धव ठाकरे एकत्र येणार अशी चर्चा अनेक वेळा आली आहे. जेव्हा काही विषय नसतात तेव्हा हे विषय सोडले जातात. आम्ही एकत्र येण्याचा प्रश्र्न नाही आम्ही महायुतीत आहे. माहितीत राहून राज्याचे हित कसे सांभाळता येईल यासाठी आमचा प्रयत्न राहील.असे राष्ट्रवादी काँग्रेस गटनेते आमदार अजित पवार यांनी सांगितले.



CMYK

## महात्मा जोतीराव फुले

भारताचे थोर सुपुत्र, विचारवंत, समाजसुधारक, लेखक महात्मा जोतीराव फुले यांचा आज स्मृतिदिन. महात्मा जोतीराव फुले यांचा जन्म ११ एप्रिल १८२७ रोजी झाला. जोतीरावांच्या वडिलांचे नाव गोविंदराव तर आईचे नाव चिमणाबाई असे होते. सातारा जिल्ह्यातील कटगुण हे त्यांचे मूळ गाव. त्यांचे आडनाव गोऱ्हे असे होते पण त्यांच्या वडिलांचा फुले विक्रीचा व्यवसाय होता त्यामुळे ते फुले म्हणूनच ते ओळखले जाऊ लागले पुढे फुले हेच आडनाव रूढ झाले. काही दिवसांनी कटगुणहुन त्यांचे कुटुंबीय पुरंदर तालुक्यातील खानवडी येथे आले. खानवडी येथे त्यांचे घर असून त्यांच्या नावे सात बाराचा उतारा देखील आहे. प्राथमिक शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांनी भाजी विक्रीचा व्यवसाय केला. जोतीराव फुले यांना लहानपणापासून शिक्षणाची आवड होती. १८४२ साली त्यांनी पुण्याच्या स्कॉटिश मिशन हायस्कूलमध्ये माध्यमिक शिक्षण घेण्यासाठी प्रवेश घेतला. अतिशय तल्लख बुद्धीच्या जोतिरावांनी पाच सहा वर्षातच तो अभ्यासक्रम पूर्ण केला. २३ सप्टेंबर १८७३ रोजी महात्मा फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. तथाकथित सनातनी उच्चवर्णीय लोकांकडून सर्वसामान्य लोकांवर होणारा अन्याय अत्याचर दूर करणे तसेच गुलामगिरीतून शूद्रातिशूद्र समाजाची मुक्तता करणे व त्यांना त्यांच्या हक्काची जाणीव करुन देणे हे सत्यशोधक समाजाचे ध्येय होते. 'सर्वसाक्षी जगतपती। त्याला नकोच मध्यस्ती||' हे या समाजाचे घोषवाक्य होते. सत्यशोधक समाजाने गुलामगिरीविरुद्ध आवाज उठवला आणि समाज न्यायाची व सामाजिक पुनर्रचनेची मागणी केली. या समाजातर्फे पुरोहितांशीवाय लग्न लावण्यास सुरवात केली. मराठीत मंगलाष्टके रचली. समाजातील तळागाळातील लोकांपर्यंत शिक्षण पोहचवणे हे सत्यशोधक समाजाचे महत्वाचे ध्येय होते. महात्मा फुले यांनी एका कवितेत शिक्षणाचे महत्व पटवून देताना म्हटले आहे की

विद्येविना मती गेली ।
मतिविना नीती गेली।
नितीविना गती गेली ।
गतिविना वित्त गेले ।
वित्ताविना शूद्र खचले ।
इतके अनर्थ एका अविद्येने केले ||

एक महिला शिकली तर संपूर्ण कुटुंब शिकते. समाज शिक्षित करायचा असेल आणि बहुजन समाजात शिक्षण मुहूर्तमेढ रोवयची असेल तर महिलांना शिक्षित व्हायलाच हवे असे त्यांचे मत होणे म्हणूनच त्यांनी त्याची सुरवात स्वतःच्या घरापासून केली. जोतिरावांनी त्यांच्या पत्नी सावित्रीबाईंना शिक्षण देऊन शिक्षण कार्यास प्रवृत्त केले. महात्मा फुले यांनी १९४८ साली पुण्यातील भिडे वाड्यात मुलींची पहिली शाळा काढून तेथील शिक्षिकेची जबाबदारी सावित्रीबाईंवर सोपवली. पुढे सावित्रीबाई या शाळेच्या मुख्याध्यापिकापदी आरूढ झाल्या.शाळेच्या मुख्याध्यापकपदी आरूढ झालेली भारतातील पहिली महिला म्हणजे सावित्रीबाई फुले त्याचप्रमाणे मुलींसाठी पहिली शाळा काढणारे पहिले भारतीय म्हणजे महात्मा जोतीराव फुले. महात्मा जोतीराव फुलेंनी देशात मुलींच्या शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. आज सर्वच क्षेत्रात महिला आघाडीवर आहेत असे कोणतेच क्षेत्र नाही की ज्यात महिलांनी आपला झेंडा रोवला नाही. कला, क्रीडा, साहित्य, विज्ञान, तंत्रदान, शिक्षण, समाजकारण, राजकारण, अर्थकारण अशा सर्वच क्षेत्रात महिला आघाडीवर आहेत त्या केवळ आणि केवळ फुले दाम्पत्यांमुळे. महिलांसाठी फुले दाम्पत्यांनी जे कार्य केले ते ३३ कोटी देवांनीही केले नाही. महात्मा फुले यांनी पुण्यातील वेताळ पेठेत १८५२ साली अस्पृश्ययांसाठी शाळा स्थापन केली. त्यांच्या या शैक्षणिक कार्याला सनातन्यांनी खूप वविरोध केला. मुलींनी शिक्षणासाठी घराबाहेर पडणे म्हणजे धर्म बुडणे अशी आरोळी ठोकत सनातनी लोकांनी महात्मा फुले यांच्या या महान कार्यास विरोध केला. त्यांना मारण्यासाठी मारेकरी पाठवले पण महात्मा फुले डगमगले नाहीत. ते आपल्या भूमिकेवर ठाम राहिले. महात्मा जोतीराव फुले यांना वाचनाची खूप आवड होती. विवीध महापुरुषांचे जीवनचरित्र वाचणे व त्यातून प्रेरणा घेणे हा त्यांचा आवडीचा छंद. छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र व थॉमस पेन या विचारवंतांच्या राईट ऑफ थॉट्स या ग्रंथाचा त्यांच्यावर खूप प्रभाव पडला. बहुजन समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा आणि दारिद्य पाहून ते खूप अस्वस्थ होत. जातपात, अस्पृश्य- स्पृश्य भेदभाव पाहून त्यांना खूप राग येत. समाजातील अज्ञान अंधश्रद्धा दूर करून समाजातील जातीभेद नष्ट करण्याचा त्यांनी निश्र्चय केला. कोणताही धर्म ईश्र्वराने निर्माण केलेला नाही आणि चातुर्वर्ण्य व जातीभेद ही निर्मिती मानवाचीच आहे असे त्यांचे रोखठोक मत होते. सर्व मानव एकच आहेत म्हणून सर्वांनी गुण्यागोविंदाने राहावे असे त्यांचे मत होते. त्यांनी लिहिलेल्या शेतकऱ्यांचा आसूड या पुस्तकातून महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची विदारक दुर्दशा आणि दारिद्र्याची वास्तवता विशद केली आहे. या पुस्तकाद्वारे विशाल दृष्टिकोनाचे क्रांतिकारक म्हणून महात्मा फुलेंचे दर्शन होते. महात्मा फुले यांनी सार्वजनिक सत्यधर्म हा ग्रंथ लिहिला. हा ग्रंथ सत्यशोधक समाजाचा प्रमाण ग्रंथ मानला जातो. तुकारामांच्या अभांगाचा त्यांना गाढा अभ्यास होता. अभंगाच्या धर्तीवर त्यांनी अनेक अखंड रचले. त्यांना सामाजिक विषमतेचे जागतिक भान होते म्हणूनच आपला गुलामगिरी हा ग्रंथ त्यांनी अमेरिकेतील कृष्णवर्णीयांना समर्पित केला. अस्पृश्यांची कैफियत हा त्यांचा अप्रकाशित ग्रंथ आहे. २८ नोव्हेंबर १८९० रोजी महात्मा फुले यांचे निधन झाले. आज त्यांच्या स्मृतिदिनी त्यांचे स्मरण करणे हे आपले कर्तव्यच आहे. महात्मा फुलेंना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

# उर्ध्व पैनगंगा कालव्यातून १ डिसेंबर पासून सिंचनाखाली

दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी** : उर्ध्व पेनगंगा प्रकल्पांतर्गत इसापूर डावा कालवा व इसापूर उजवा कालवा तसेच त्याअंतर्गत असलेल्या वितरण व्यवस्थेद्वारे प्रत्येक पाणीपाळीच्या कालवा संचलनाच्या प्रस्तावित कार्यक्रमानुसार प्राप्त मागणीनुसार सिंचनासाठी पाणी सोडण्यात येणार आहे. सिंचनासाठी पाण्याची गरज तसेच विहीत नमुन्यात प्राप्त मागणी अर्ज संख्या विचारात घेऊनच प्रत्यक्ष सिंचनासाठी पहिली पाणीपाळी १ डिसेंबर २०२४ रोजी सुरू करून पुढील पाणीपाळ्या सुरू करण्याचे नियोजन आहे. प्रकल्प क्षेत्रातील सर्व जनतेनी / लाभधारकांनी पाणी मागणी अर्ज विहीत कालावधीत सादर करावेत, असे आवाहन उर्ध्व पेनगंगा प्रकल्प विभाग क्र. १ चे कार्यकारी अभियंता अ. बा. जगताप यांनी केले आहे.

दरवर्षी उर्ध्व पेनगंगा प्रकल्पावरील कालवा सल्लागार समितीच्या बैठकीमध्ये प्रकल्पावरील सिंचनासाठी पाण्याचे नियोजन करण्यात येते. यावर्षी महाराष्ट्र विधानसभा निवडणुका-२०२४ ची आचारसंहिता लागू झाल्याने प्रकल्पावरील कालवा सल्लागार समितीची बैठक विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांच्या अध्यक्षतेखाली २५ नोव्हेंबर २०२४ रोजी संपन्न झाली. या बैठकीमध्ये आगामी होणाऱ्या कालवा सल्लागार समितीच्या बैठकीतील निर्णयाच्या अधीन राहून १५ ऑक्टोबर २०२४ रोजीच्या धरणातील (९६४.१० दलघमी) शंभर टक्के इतक्या जिवंत पाणीसाठ्यावर आधारीत रब्बी हंगामात तीन (३) पाणीपाळ्या व उन्हाळी हंगामात चार (४) पाणीपाळ्या देण्याच्या नियोजनास मान्यता मिळालेली आहे.



प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील लाभधारकांना व धरण जलाशय, अधिसुचित नदी-नाल्यावरील तसेच मुख्य कालव्यावरील प्रवाही व मंजूर उपसा सिंचन योजना धारकांनी रब्बी हंगामातील हंगामी, दुहंगामी तसेच दुहंगामातील इतर उभी पिके या पिकांसाठी कालव्याचे प्रवाही/कालव्यावरील उपसा, नदी-नाल्यावरील मंजूर उपसा सिंचन योजनेद्वारे सिंचनासाठी पाणी घ्यायचे असल्यास मागणी अर्ज नमुना ७, ७-अ मध्ये भरून संबंधित शाखा कार्यालयात सादर करणे बंधनकारक राहील. हंगामी व दुहंगामी पिकांसाठी स्वतंत्र अर्ज सादर करावेत. सिंचनासाठी पाण्याची गरज तसेच विहीत नमुन्यात प्राप्त मागणी अर्ज संख्या विचारात घेऊनच प्रत्यक्ष सिंचनासाठी पहिली पाणीपाळी दिनांक १ डिसेंबर २०२४ रोजी सुरू करून पुढील पाणीपाळ्या पुढीलप्रमाणे सुरू करण्याचे अपेक्षित नियोजन आहे.

सन २०२४-२५ चा रब्बी सिंचन कार्यक्रम आवर्तन कार्यक्रम क्र. १ इसापूर उजवा कालवा इसापूर डावा कालव्यातून १ ते २२ डिसेंबर पर्यंत २२ दिवस, आवर्तन कार्यक्रम क्र. २ साठी कालावधी १ ते २२ जानेवारी तर आवर्तन कार्यक्रम क्र. ३ साठी १ ते २२ फेब्रुवारी २०२४ पर्यंत २२ दिवसांसाठी राहील. पाऊस किंवा आकस्मिक घटनांमुळे आवर्तनाच्या दिनांकात बदल होऊ शकतो.

नमुना नं.७,७-अ प्राप्त झालेल्या पाणी अर्जास खालील अटी व शर्तीचे अधीन राहुन मंजुरी देण्यात येईल. लाभधारकांना त्यांच्याकडील संपुर्ण थकबाकी पाणीपट्टी भरावी लागेल. पिकांचे मागणी क्षेत्र २० आर च्या पटीत असावे.रब्बी हंगामी, दुहंगामी व इतर बारमाही पिकांसाठी कालव्याचे प्रवाही/मंजूर उपसा/मंजूर जलाशय उपसा व मंजूर नदि/नाले उपसा सिंचनासाठी ज्यांना पाणी घ्यावयाचे आहे त्यांनी आपले पाणी मागणी अर्ज विहीत नमुन्यात सादर करावे व अर्जासोबत उपसा सिंचन परवानगीची प्रत जोडावी. तसेच पाणी अर्जासोबत अपत्याबाबतचे प्रमाणपत्र व अल्प अत्यल्प भुधारक असल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करावे.

कालव्याचे पाणी शेतात नेण्यासाठी असलेली शेतचारी स्वच्छ व व्यवस्थित ठेवण्याची जबाबदारी संबंधित लाभधारकाची आहे. काही अपरिहार्य कारणास्तव किंवा तांत्रीक कारणास्तव पाणी पुरवठा करणे शक्य न झाल्यास होणाऱ्या नुकसानीस हे कार्यालय जबाबदार राहणार नाही. तसेच महाराष्ट्र पाटबंधारे प्रचलित नियमांचे लाभधारकांकडून उल्लंघन झाल्यास, कोणतीही आगाऊ सुचना न देता दिलेली मंजुरी रद्द करण्यात येईल व पाणीपुरवठा रद्द करण्यात येईल. सिंचन पाणीपाळी दरम्यान कालव्याची काही तुटफूट झाल्यास, त्याची दुरूस्ती झाल्यानंतरच कालव्यात पाणी सोडण्यात येईल.

महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम १९७६, कालवे नियम १९३४, म. सिं. प. शे. व्य. कायदा २००५ तसेच महाराष्ट्र जलसंपदा विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या तरतुदीनुसार सर्व शर्ती व अटी बंधनकारक राहतील याची सर्व लाभधारकांनी नोंद घ्यावी.कालवा संचलन कार्यक्रमानुसारच पाणी घेणे बंधनकारक राहील. पाणीपट्टी न भरणाऱ्या व पाणी अर्ज नामंजुर असलेल्या लाभधारकास सिंचनासाठी पाणी देणे या कार्यालयास बंधनकारक राहणार नाही.लाभधारकांनी दिवस व रात्रीच्या वेळेस पाणी घेणे बंधनकारक आहे. रात्रीच्या वेळेस पाणी न घेतल्यामुळे पाणी नदीनाल्यास वाया जावून ठराविक मुदतीत पाणी न मिळाल्यास या कार्यालयाची जबाबदारी राहणार नाही. शासन निर्णयातील प्रचलित दरानुसार पाणीपट्टीचे दर आकरण्यात येतील. उडाप्याच्या/अंतिम क्षेत्रास पाणी पुरवठा करणे बंधनकारक राहणार नाही. पाणी पाळी सुरू असताना जबरदस्तीने अथवा विनापरवानगी विद्युत मोटारी, ट्रॅक्टर द्वारे पाणी उपसा करणे अथवा गेट उघडल्यास नियमानुसार दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल. जे लाभक्षेत्र पाणी वापर संस्थेस हस्तांतरीत करण्यात आले आहे त्या लाभक्षेत्रावर नियमानुसार पाणी मागणी, वसुली आणि सिंचनाचे नियंत्रण पाणी वापर संस्थेने करावे, अन्यथा पाणी पुरवठा केला जाणार नाही. सबंधीत प्रकल्पाच्या विभागामार्फत सर्व लाभधारकांना पाणी मिळेल या दृष्टीने पुरेपूर प्रयत्न करण्यात येत आहेत. याची संबंधित लाभधारकांनी नोंद घ्यावी, असेही आवाहन उर्ध्व पेनगंगा प्रकल्प विभाग क्र. १ चे कार्यकारी अभियंता अ. बा. जगताप यांनी केले आहे.

# वाहन वितरकांच्या स्तरावरच होणार हलक्या मालवाहू वाहनांची ऑनलाईन नोंदणी

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : हलक्या मालवाहू वाहनांची नोंदणी फेसलेस (चेहरा विरहित) स्वरूपात वाहन वितरक यांच्या स्तरावरच ऑनलाइन पद्धतीने करण्याची सुविधा २८ नोव्हेंबर पासून उपलब्ध करून देण्यात आली आहे. राज्यभरातील सर्व परिवहन कार्यालयांसाठी ही सुविधा कार्यान्वित असणार आहे. तसेच ही सुविधा सर्व संबंधित वाहन वितरकांकडे उपलब्ध असणार आहे. ही सेवा पूर्णपणे फेसलेस (चेहरा विरहित) स्वरुपाची असून वाहन वितरकास त्यासाठी www.parivahan.gov.in या संकेतस्थळावर वाहन मालकाचा वाहन नोंदणी अर्ज करावा लागणार आहे. तसेच वाहन नोंदणी शुल्क व वाहन कराचा भरणा करून नोंदणी करता येणार आहे. सद्यस्थितीत खाजगी वाहनांच्या नोंदणीप्रमाणेच हलक्या मालवाहू वाहनांची नोंदणी या सुविधेमुळे वाहन वितरकांकडे करता येणे शक्य होणार आहे.



त्यामुळे आता हलकी मालवाहू वाहने, यापुढे परिवहन कार्यालयात नोंदणीसाठी आणण्याची आवश्यकता राहणार नाही व नोंदणीची प्रक्रिया विनासायास होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे वाहन धारकांच्या वेळेची व इंधनाची बचत होणार आहे. वाहन वितरकांस काही तांत्रिक अडचण आल्यास त्यांनी dytccomp.tpt-mhgov.in येथे ई-मेलद्वारे संपर्क साधावा.

तरी, सर्व नागरिकांनी व संबंधित वाहन वितरकांनी याची नोंद घेऊन, त्याप्रमाणे कार्यवाही करावी व सेवेचा लाभ घ्यावा असे आवाहन परिवहन आयुक्त विवेक भिमनवार यांनी केले आहे.

## नांदेडमधील ३३ केंद्रांवर १ डिसेंबरला एमपीएससी परीक्षा

**नांदेड/प्रतिनिधी** : राज्य शासनाने नोकर भरती मोठ्याप्रमाणात सुरू केली असून याअंतर्गत महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा-२०२४ ही येत्या १ डिसेंबरला होणार आहे. नांदेडमधील सर्व प्रमुख शाळा व महाविद्यालयांमध्ये या परीक्षेचे केंद्र असून परीक्षेसंदर्भात असणारी नाकाबंदी व शंभर मिटर पर्यंत प्रवेश बंदी केली जाणार आहे. नागरिकांनी विद्यार्थ्यांच्या या महत्त्वपूर्ण परीक्षेला लक्षात घेऊन सहकार्य करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी केले आहे.

सकाळी १० ते दुपारी १२ व दुपारी ३ ते ५ याकालावधीमध्ये दोन सत्रात ही परीक्षा होणार आहे. त्यामुळे रविवारी सेंटर असलेल्या शाळा, महाविद्यालयांच्या परिसरात कोलाहल असणार नाही. कुठेही डिजे वाजणार नाही. किंवा शंभर मिटर पर्यंत मोबाईलपासून सर्व प्रकारच्या साहित्याला परिक्षा केंद्राच्या परिसरात वापरण्यास बंदी घालण्यात आली आहे. भारतीय नागरी सुरक्षा संहिता कलम १६३ अन्वये सर्व निर्बंध लादण्यात आले असून नागरिकांनी सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे.

## डोंगरीतील रहिवाशी इमारतीला भीषण आग; परिसरात धुराचे मोठे लोट!

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : आज सकाळी मुंबईतील अंधेरी पश्चिम भागात आग लागल्याची घटना घडली होती. मुंबईतील आगीची घटना ताजी असताना आता पुन्हा मुंबईतच भीषण आग लागल्याची बातमी समोर आली आहे.

मुंबईमधील डोंगरी परिसरात अन्सारी हाईट्स नावाच्या इमारतीला भीषण आग लागली आहे. घटनेची माहिती मिळताच अग्निशामक दलाच्या पाच गाड्या आणि चार टॅंकरच्या गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या आहेत. या इमारतीत अनेक लोक अडकून पडल्याची शक्यता वर्तवण्यात येत असून दलाच्या मदतीने आग विझवण्याचे शर्थीचे प्रयत्न सुरु आहेत. तसे आग लागण्याचे कारण अद्यापही समोर आलेले नाही.

## ठाणे महापालिकेत उंदरांचा सुळसुळाट, अधिकाऱ्यांच्या कार्यालय परिसरात उंदीर पकडण्यासाठी पिंजरे

**ठाणे/प्रतिनिधी** : ठाणे शहराच्या कारभाराचे मुख्य केंद्र असलेल्या पाचपाखाडी भागातील ठाणे महापालिका मुख्यालय इमारतीत उंदरांचा सुळसुळाट झाला आहे. अधिकाऱ्यांच्या कार्यालयात असलेल्या महत्वाची कागदपत्रे उंदिर कुरतडण्याची भिती व्यक्त होत असून या भितीतूनच अधिकाऱ्यांनी आता आपल्या कार्यालयात उंदिर पकडण्यासाठी पिंजरे ठेवली आहेत. गेल्या काही दिवसांत प्रत्येक केबीनमधून ८ ते १० उंदीर पकडण्यात आल्याचे पालिका सुत्रांनी सांगितले. या उंदरांच्या सुळसुळाटामुळे अधिकारी आणि कर्मचारी हैराण झाल्याचे चित्र आहे.

ठाणे महापालिकेचा कारभार पाचपाखाडी येथील पालिका मुख्यालय इमारतीतून चालतो. ही तळ अधिक चार मजली इमारत आहे. या इमारतीत आयुक्त, अतिरिक्त आयुक्त, उपायुक्त, सहाय्यक आयुक्त, सार्वजनिक बांधकाम विभाग, पाणी पुरवठा, घनकचरा, शहर विकास, आरोग्य विभाग आणि इतर विभागाच्या प्रमुख अधिकाऱ्यांची कार्यालये आहेत. याशिवाय, महापालिका मुख्यालय इमारतीत पालिका पदाधिकारी आणि राजकीय पक्षांची कार्यालये आहेत. ठाणे शहराच्या कारभाराचे केंद्र म्हणून पालिका मुख्यालय इमारत ओळखली जाते. शहरातील अनेक विकास कामांचे प्रस्ताव तयार करून त्याची अंमलबजावणी पालिका करते. या सर्व प्रस्तावांच्या फाईल पालिका मुख्यालयात ठेवण्यात येतात. परंतु या फाईलमधील कागदपत्रे उंदीर कुरतडण्याची भीती व्यक्त होत आहे.

# पसंतीच्या वाहन नोंदणी क्रमांक आरक्षणासाठी ऑनलाईन सुविधा

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : नवीन नोंदणी क्रमांकाची मालिका सुरू केल्यानंतर क्रमांक आरक्षित करण्यासाठी लिलावाची प्रक्रिया परिवहन कार्यालयामार्फत राबविण्यात येते. लिलावाची ऑफलाईन प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर उर्वरित अनारक्षीत नोंदणी क्रमांक ऑनलाईन पद्धतीने आरक्षित करता येणार आहेत. त्यासाठी वाहन धारकांना पसंतीचा वाहन नोंदणी क्रमांक आरक्षीत करण्यासाठी परिवहन कार्यालयांमध्ये येण्याची गरज नाही. पसंतीचे वाहन नोंदणी क्रमांक आरक्षीत करण्यासाठी राज्यातील सर्व परिवहन कार्यालयांसाठी ऑनलाईन सुविधा कार्यान्वीत करण्यात आली आहे.

ही सेवा पूर्णपणे फेसलेस (चेहराविरहित) स्वरूपाची असून त्यासाठी अर्जदारास आधार संलग्न मोबाईल क्रमांक आवश्यक आहे. हा मोबाईल क्रमांक नोंद करून आधार ओटीपी किंवा मोबाईलद्वारे ओटीपी प्राप्त करून https://fancy.parivahan.gov.in/ या संकेतस्थळावर पसंतीचा नोंदणी क्रमांक आरक्षित करता येणार आहे.




सद्यस्थितीत नवीन मालिका सुरू केल्यानंतर नोंदणी क्रमांक आरक्षित करण्यासाठी लिलावाची कार्यपद्धती पूर्वीप्रमाणेच ऑफलाईन पद्धतीने सुरू राहणार आहे. विविध संवर्गातील वाहनांसाठी नवीन मालिका सुरू केल्यानंतर प्रथम संबंधित कार्यालयामार्फत आकर्षक अथवा पसंतीच्या क्रमांकासाठी अर्ज स्वीकारले जातील. त्यामध्ये पसंतीच्या नोंदणी क्रमांकासाठी एकापेक्षा जास्त अर्ज प्राप्त झाल्यास त्याबाबत लिलावाची प्रक्रिया पूर्ण करून जास्तीच्या रकमेचा धनाकर्ष सादर करणाऱ्या अर्जदारास संबंधित कार्यालयातील रोखपालद्वारे पसंतीच्या क्रमांकाचे शुल्क भरणा केल्याची पावती जारी करण्यात येईल.

या फेसलेस सेवेमुळे सुमारे २.५० लाख वाहन मालकांना परिवहन कार्यालयांना भेट देण्याची आवश्यकता नाही. नागरिकांना काही तांत्रिक अडचण आल्यास त्यांनी dytccomp.tpt-mhgov.in येथे ई-मेलद्वारे संपर्क साधावा. आकर्षक/पसंती क्रमांक आरक्षित करण्यासाठी वरीलप्रमाणे (workflow) कार्यपद्धतीचा अवलंब वाहनधारकांनी करावा व या फेसलेस सेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन परिवहन आयुक्त विवेक भिमनवार यांनी केले आहे.

### अशी करा ऑनलाइन पद्धतीने नोंदणी

अर्जदाराने https://fancy.parivahan.gov.in/ या संकेतस्थळावर जावून न्यू युजर / रजिस्टर नॉऊ यावर क्लिक करावे. यामध्ये संपूर्ण नोंदणीची प्रक्रिया पूर्ण करून ईमेल व मोबाईल क्रमांक ओटीपीद्वारे पडताळून घ्यावे. त्यानंतर संकेतस्थळावर लॉग इनमध्ये जावून ईमेल किंवा मोबाईल क्रमांकावर प्राप्त झालेले युजर आयडी व पासवर्ड टाकून लॉग इन करावे. त्यानंतर अर्जदाराने ऑनलाईन उपलब्ध असणारे पसंती क्रमांक निवडावे. यासाठी घेण्यात येणारे शुल्क एसबीआय ई पे या पेमेंट गेटवेवरून ऑनलाईन अदा करावे आणि प्रक्रिया पूर्ण करावी. त्यानंतर ई पावती प्रिंट काढून संबंधित वाहन विक्रेत्याकडे (डीलर) कडे नोंदणीसाठी देण्यात यावी.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## महत्त्वाचे...

### चोपड्यात वातावरण बदलामुळे रुग्णसंख्येत वाढ, कावीळच्या रुग्णात प्रथमदर्शनी वाढ



दैनिक आपला विदर्भ

**जळगाव/प्रतिनिधी** : थंडीची चाहूल लागल्याने वातावरणात बदल झाले आहे. त्यामुळे चोपडा तालुक्यातील रुग्ण रुग्णसंखेत वाढ झाली आहे बाहेरगावी जाऊन येणारे व दूषित पाणी अन्नपदार्थ खाल्ल्यामुळे कावीळ चे रुग्ण प्रथम दर्शनी वाढ झालेले दिसून येत आहे. चोपडा उपजिल्हा रुग्णालयात रोजचे रुग्ण संख्येत वाढ होताना दिसत आहे वातावरण बदलामुळे आणि कावीळचे रुग्णसंख्येत प्रथम दर्शनी वाढ होताना दिसत आहे. रोज चोपडा उपजिल्हा रुग्णालयात पाचशे रुग्णाच्या वर तपासणी सुरू असल्याची उपजिल्हा रुग्णालयाचे अधीक्षक डॉक्टर सुरेश पाटील यांनी सांगितले.

### काँग्रेसचे एकनिष्ठ आमदार आमच्या सोबत बाळासाहेब थोरात यांचा विश्वास



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : नुकत्याच जाहीर झालेल्या विधानसभा निकालाबाबत तीन महिन्यात असे काय घडलं ?, नेमका काय बदल घडला,कोणत्या कारणाने जनतेने असा निकाल दिला.याचा विचार करत आहे.काँग्रेसचे एकनिष्ठ आमदार आमच्या सोबत आहेत. असा विश्वास काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी व्यक्त केला.

मुंबई येथे माध्यमांशी बोलताना ते म्हणाले की, विधानसभा निकालाबाबत जे घडले ते वेगळं आणि कल्पने पलीकडेचे आहे. उभारी होईल जनतेच्या मनात खूप शंका आहे. ठाकरे यांनी कोणासोबत निवडणूक लढावे, हा ज्याचा त्याचा अधिकार असतो, कल्पनेच्या पलिकडे आहे. मुख्यमंत्री शिंदे पत्रकार परिषदेमध्ये काय बोलतात हे ऐकण्याची आमचीही उत्सुकता आहे. आलेला निकाल त्यांच्या देखील कल्पनेच्या पलीकडचे आहेत. काँग्रेस आमदार एकनिष्ठ आहेत ते राहतील, सर्व आमदार आमचे सोबत राहतील, याबाबत आम्हाला शंका नाही. विखे पाटील यांनी केलेल्या आरोपाबाबत बोलताना ते म्हणाले की, मीडियाचा गैरउपयोग केला आहे, त अशोक चव्हाण यांचा काँग्रेसने नेहमी सन्मान केला. त्यांचा हेतू साध्य करण्यासाठी ते गेले आहेत, असा टोलाही त्यांनी लगावला. एकनाथ शिंदे मौन सोडतात तर ते ऐकण्यासाठी आम्ही देखील इच्छुक आहे.ईव्हीएममध्ये निश्र्चित प्रॉब्लेम आहे हे. माहिती नाही चौकशी करू, आणि भंडाफोड करू , असा विश्र्वास काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी व्यक्त केला.

### राष्ट्रीय युवा महोत्सवात सहभागी होण्यासाठी सज्ज व्हा; प्रधानमंत्र्यांसोबत भेटण्याची संधी

दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी** : तुमच्यामध्ये नेतृत्व गुण असेल उद्याचे नेतृत्व करण्याची इच्छा असेल तर केंद्र सरकारने सुरू केलेल्या उपक्रमामध्ये अर्थात विकसित भारत युवा नेते संवाद म्हणजेच राष्ट्रीय युवा महोत्सव २०२५ मध्ये सहभागी होण्यासाठी अर्ज करण्याचे आवाहन जिल्हा युवा अधिकारी नेहरू युवा केंद्र नांदेड यांनी केले आहे. भारत सरकारने हा उपक्रम जाहीर केला असून देशभरातील २ हजार तरुण तरुणींनी १२ ते १३ जानेवारीला भारत मंडपम येथे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्यासोबत विकसित भारताचे व्हिजन मांडणार आहेत. ही सुवर्ण संधी असून त्यासाठी वेगवेगळ्या पात्रता फेरीला १५ ते २९ वयोगटातील तरुणांना तोंड द्यावे लागणार आहे. नांदेड जिल्ह्यातील युवापिढीने यामध्ये सहभागी व्हावे. त्यासाठी व्किज२डॉटमायजिओव्हीडॉटइन (ग्रिंिळ२.ूर्सीं.ळप) या लिंकवरून सहभाग नोंदवता येतो. ही ऑनलाईन नोंदणी करून नोंदणी प्रक्रिया समजून घ्यावी किंवा नांदेड जिल्ह्याच्या नेहरू युवा केंद्र राज निवास शिवरायनगर मालेगाव रोड नांदेड येथे संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा युवा अधिकारी चंदा रावळकर यांनी केले आहे.

### ४ डिसेंबरपासून होणाऱ्या जंतनाशक अभियानात सहभागी व्हा जंतनाशक गोळी घेण्यासाठी घाबरू नका

दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी** : राज्यात ४ डिसेंबर रोजी राष्ट्रीय जंतनाशक दिन राबविण्यात येत असून याअंतर्गत १ ते १९ वयोगटातील सर्व मुला-मुलींना जंतनाशक गोळी दिली जाणार आहे. ही गोळी चावून खाणे गरजेचे आहे किंवा पाण्यात घेता येईल. या उपक्रमाला सहकार्य करण्याचे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संगिता देशमुख यांनी केले आहे.

जिल्ह्यातील अर्धापूर, धर्माबाद, लोहा, मुदखेड, नांदेड व उमरी या तालुक्यांमध्ये ही मोहिम राबविली जाणार आहे. सर्व शाळांमधून अल्बेंडझोलची गोळी देण्यात येणार असून लहान मुलांना पाण्यातून तर ६ ते १९ वयोगटातील मुलांना चावून खाण्यासाठी सांगण्यात येणार आहे. ४ डिसेंबरला जे वंचित राहिले त्यांना १० डिसेंबरला ही गोळी दिली जाणार आहे. चांगल्या आरोग्यासाठी ही गोळी अतिशय आवश्यक असून शिक्षक, पालक यांनी या मोहिमेला सहकार्य करण्याचे आवाहन त्यांनी केले आहे.

# अपूर्ण कामे दोन महिन्यात पूर्ण होतील : उदय सामंत

दैनिक आपला विदर्भ



**रत्नागिरी/प्रतिनिधी** : रत्नागिरी जिल्ह्यातील १५ पैंकी १४ जागा आम्ही जिंकल्या आहेत. विकासात्मक जवाबदारी आम्हा सर्वांवर आहे, ती आम्ही पूर्ण करू, रत्नागिरीतील सर्व अपूर्ण कामे २ महिन्यात पूर्ण होतील, जिल्ह्यात आभार मानण्यासाठी मी जाणार. तो दौरा लवकरच करणार असल्याची माहिती शिवसेना नेते उदय सामंत यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

यावेळी शिवसेना नेते उदय सामंत माध्यमांशी बोलताना म्हणाले की, जिल्ह्यातील दोन प्रोजेक्ट लवकरच सुरू होतील, आमचे नेते एकनाथ शिंदे आहेत. आमचा नेता मोठ्या पदावर बसावा ही आमची इच्छा आहे. भाजपच्या आणि संघाच्या पदाधिकाऱ्यांचे आभार मानतो, पण भाजपच्या काही लोकांनी काम केले नाही, तेच काल भाजपच्या व्यासपीठावर होते, हे महायुतीच्या दृष्टीने योग्य नाही, सगळ्यांना बरोबर घेऊन जाण्याची भूमिका आहे. माझ्या विरोधात काम करून काहींना शांत झोप लागत असेल तर चांगले आहे. काही लोकं आमचा अस्त करायला निघाले होते, आता त्यांचाच अस्त झाला. सर्व आमदार मुंबईत पत्रांवर सह्या केल्या आणि मतदारांचे आभार मानायला जा असं शिंदे साहेबांनी सांगितले, त्यात गैर काय, असा प्रश्र्न त्यांनी केला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे नाराज नाहीत असा स्पष्टीकरणही यावेळी त्यांनी दिले. भावनाप्रधान नेता होऊ शकत नाही, आम्ही त्यांना सर्व अधिकार दिले आहेत.आमच्या यशाचे गमक माझी लाडकी बहीण योजना आहे. ६ टक्के मतदान वाढले आहे. विरोधकांना स्वतःचा विरोधी पक्ष नेमता येई नये अशी परिस्थिती आहे. आहेत त्यातले आजुबाजुला जाणार नाहीत याची आता दक्षता घ्यावी, असा सल्लाही यावेळी सामंत यांनी दिला. माझी आणि भास्कर जाधव यांची भेट झाली नाही, समोरून भेट झाली तर १०० टक्के भेटणार, जे पडलेत त्यांच्याकडे सन्नाटा आहे. शिवसेना बार्गेनिंग पॉवर कमी आहे. २०१४ ला वेगळी परिस्थिती होती. आता आम्ही महायुतीत लढलो आहोत. रत्नागिरी विमानतळ लवकरात लवकर सुरू होणार आहे. माझे नाव उपमुख्यमंत्री पदासाठी चर्चेत आहे, हे मला माहिती नाही असेही ते म्हणाले. माझ्या विरोधात कुठे मिटिंग झाली, काय चर्चा झाली हे सर्व मला माहिती आहे, पण मी बोलणार नाही. माझा राजकीय गेम कोणीही करू शकत नाही हे जनतेने दाखवून दिले, असे शिवसेना नेते उदय सामंत यांनी सांगितले.

## आमदार किशोर पाटील यांनी मतदारांचे व विशेष करून लाडक्या बहिणींचे मानले आभार

दैनिक आपला विदर्भ



**जळगाव/प्रतिनिधी** : पाचोरा भडगाव विधानसभा मतदारसंघात निवडणूकीत महायुतीचे उमेदवार व शिवसेना शिंदे गटाचे विद्यमान आमदार किशोर पाटील यांनी तिसऱ्यांदा विजय हॅट्रिक करून भरघोस मतांनी विजय मिळवून पाचोरा भडगाव विधानसभा मतदारसंघात रेकॉर्ड केला आहे. आतापर्यंत कुठलाही लोकप्रतिनिधी तिसऱ्यांदा या मतदारसंघातून विजयी झालेला नाही मात्र आमदार किशोर पाटील यांनी तिसऱ्यांदा विजयी हॅट्रिक साधली आहे.

आज पाचोरा येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकातील शिवालय शिवसेना कार्यालय पाचोरा येथे शिवसेना शिंदे गटाचे आमदार किशोर पाटील यांनी पत्रकार परिषद घेऊन यावेळी तमाम पाचोरा भडगाव विधानसभा मतदारसंघातील मतदारांचे व विशेष करून लाडक्या बहिणींचे मनापासून आभार मानले. ते पुढे म्हणाले पाचोरा भडगाव विधानसभा मतदारसंघात मोठ्या मताधिक्यांनी विजयी करुन जो विश्वास दाखवला त्या विश्वासाला मी कधीही तळा जाऊ देणार नाही. माझ्या विजयानंतर विजयी मिरवणुकीमध्ये काही विरोधकांनी माझ्या कार्यकर्त्यांवर जी गुंडगिरी केली ती गुंडगिरी यापुढे मतदारसंघांमध्ये खपवून घेतली जाणार नाही. जे माझ्यावर विरोधक आरोप करत होते तेच विरोधक आज गुंडगिरीचे कामे करताना उघडे पडले आहे. सर्व जनता बघत आहे की खरे गुंडगिरी करणारे कोण आहेत ते त्यामुळे मी पाचोरा भडगाव विधानसभा मतदारसंघातील तमाम जनतेला आश्र्वासित करतो की मतदार संघात कुठलीही गुंडगिरी मी खपवून घेतली जाणार नाही तसेच मी दिलेले वचने हे शंभर टक्के पूर्ण करणार असल्याची खात्री देखील त्यांनी यावेळी दिली. पाचोरा भडगाव विधानसभा मतदारसंघ हा एक विकासाचा पॅटर्न म्हणून नक्कीच उदयास येईल यात शंका नाही

### मोठ्या लेकाची लगीनसराई सुरु असतानाच धाकट्या लेकानेही उरकला साखरपुडा, नागार्जुनच्या धाकट्या सुनेला पहिलंत का?

**मुंबई/प्रतिनिधी** : मोठ्या लेकाच्या लग्नाच्या तयारीत असलेल्या अक्किने कुटुंबात आनंद द्विगुणीत झाला आहे. नागार्जुन अक्किनेनीच्या धाकट्या मुलाने, अखिल अक्किनेनीने, झैनब रावजीसोबत साखरपुडा केला आहे. सोशल मीडियावर त्यानं ही खुशखबर शेअर करत चाहत्यांना आनंदात सहभागी करून घेतलं. त्यांच्या या पोस्टवर चाहतेही भरभरून प्रतिक्रिया देत आहेत.झैनब रावजी या आता अक्किनेनी कुटुंबाची नवीन सून होणार असल्याने, चाहत्यांमध्ये तिच्याबद्दल उत्सुकता वाढली आहे. सुंदर आणि ग्रेसफुल झैनबच्या फोटोंनी इंटरनेटवर चर्चा रंगली आहे. नागार्जुन यांच्या धाकट्या सुनेची पहिली झलक पाहून नेटिझन्सही खूश झाले आहेत.

अखीलने दिली चाहत्यांना खुशखबर

नागा चैतन्य आणि समंथा रुथ यांच्या घटस्फोटानंतर नागा चैतन्य आणि त्याचे वैयक्तिक आयुष्य चर्चेत आले. त्याने आयुष्यात पुढे जाण्याचा निर्णय घेत शोभिता धुलिपालासोबत लग्नाची घोषणा केली. आता त्याच्यापाठोपाठ त्याच्या भावानं अखील अक्किनेनंही साखरपुडा करत चाहत्यांना खुशखबर दिली आहे. अखिल अक्किनेनी झैनब रावदजीची आपला जोडीदार म्हणून निवड केली आहे. या दोघांनी साखरपुडा केल्याची बातमी नागार्जूननेही त्याच्या सोशल मीडियावरून शेअर केली आहे. अखिलने त्याच्या आणि झैनबच्या काही रोमँटीक फोटो टाकत साखरपूडा केल्याचे चाहत्यांनी इंस्टाग्रामवर जाहीर केली.

### 'अदाणींना अटक करा', राहुल गांधींच्या मागणीनंतर लोकसभेत गोंधळ; काही वेळेसाठी कामकाज तहकूब

दैनिक आपला विदर्भ



**मुंबई/प्रतिनिधी** : संसदेच्या हिवाळी अधिवेशनाचा आजचा तिसरा दिवस आहे. सकाळी लोकसभा आणि राज्यसभेचे काम काज सुरू होताच काँग्रेसने अदाणी समूहाशी संबंधित भ्रष्टाचार आणि लाचखोरीचे प्रकरण उचलले. तसेच विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी गौतम अदाणी यांना अटक करण्यात यावे, अशी मागणी लावून धरली. यावेळी काही खासदारांनी स्थगन प्रस्तावाचा मुद्दाही रेटला. तर सम ाजवादी पक्षाने संभल येथे झालेल्या जातीय हिंसाचाराचा मुद्दा पुढे करण्याचा प्रयत्न केला. विरोधकांचा गोंधळ सुरू असतानाच लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी प्रश्नोत्तराचा तास पुकारला. पण विरोधकांच्या घोषणाबाजीमुळे काही काळ कामकाज स्थगित करावे लागले.

राहुल गांधी काय म्हणाले?

लोकसभेचे विरोधी पक्षनेते यांनी लोकसभेत बोलताना संविधानावर दोन दिवस चर्चा करण्याची मागणी केली. हीच मागणी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी राज्यसभेतही केली.

तसेच संसदेबाहेर आल्यानंतर राहुल गांधींनी माध्यमांशी बोलताना गौतम अदाणी यांच्यावर टीका केली. अमेरिकेच्या न्यायालयात अदाणी समूहावर लाचखोरीचे आरोप ठेवण्यात आले आहेत, ते आरोप आज अदाणी समूहाने फेटाळून लावल्याची बातमी आली आहे. यावर बोलताना राहुल गांधी म्हणाले, ''साहजिकच अदाणी काय आरोप स्वीकारणार आहेत का? ते आरोप फेटाळणारच. प्रश्न हा आहे की? त्यांना अटक झाली पाहीजे आणि या प्रकरणाशी निगडित इतरांनाही ताब्यात घेतले पाहीजे. अमेरिकेच्या न्यायालयात त्यांच्यावर हजारो कोटींच्या भ्रष्टाचार प्रकरणी आरोप ठेवण्यात आलेले आहेत. खरंतर ते तुरुंगात असायला हवेत, पण सरकार त्यांना वाचवत आहे.''

## महायुती सरकारचा रडीचा डाव

### इस्त्रायली तंत्रज्ञानाने ईव्हीएम मशीन हॅक प्रशांत जगताप यांचा गंभीर आरोप

दैनिक आपला विदर्भ


**पुणे/प्रतिनिधी** : राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे शहराध्यक्ष व हडपसर मतदार संघातील पराभूत उमेदवार प्रशांत जगताप यांनी ईव्हीएम बाबत गंभीर आरोप केले आहे. त्यांनी ईव्हीएम मशीन हे इस्त्रायली तंत्रज्ञान वापरुन हॅक केले असल्याचा, गंभीर आरोप केला आहे. ऐवढेच नाही तर प्री प्लॅनकरून आमचा पराभव करण्यात आल्याचे देखील राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे पुणे शहराध्यक्ष जगताप यांनी म्हटले आहे. माध्यमांशी बोलताना प्रशांत जगताप म्हणाले की, ईव्हीएममुळे आमचा पराभव झाला आहे. ईव्हीएम हॅक करुन सेट करुन आमचा पराभव करण्यात आला आहे. यासाठी प्री प्लॅन करण्यात आला होता. हे सर्व जाणीवपूर्वक घडवण्यात आले आहे. इस्त्रायली तंत्रज्ञाने ईव्हीएम मशीन हॅक करण्यात आले आहे. या मशीनमध्ये पक्षचिन्ह व उमेदवारांचे चिन्ह लोड करताना गोपनीयता बाळगली जाते. त्यामुळे कोणतं चिन्ह लोड केले हे आम्हाला कळणार नाही. त्यामुळे या मशीनवर आम्हाला संशय आहे. या मशीनला खास प्रोग्राम देण्यात आला आहे. त्यानुसार मतदानाच्या दिवशी विशिष्ट वेळेत हे मशीन काम करेल. या मशीनमध्ये टाइमिंग सेट केलाय. त्यामुळे ईव्हीएममधील घोळ समोर येणार नाही. असे प्रशांत जगताप म्हणाले, तसेच



नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीचा निकाल हा महाराष्ट्राच्या दृष्टिकोनातून धक्कादायक आणि धोकादायक निकाल आहे. या निघाल्यामुळे देशातील लोकशाही संपते की काय ? असा प्रश्र्न निर्माण झाला आहे. हा निकाल आम्हाला मान्य नाही. आम्ही व्हीव्हीपॅटची मोजणी करण्यासाठी निवडणूक आयोगाकडे पैसे भरणार आहे. हे मशीन हॅक करण्यासाठी इस्त्राईलचे तंत्रज्ञान वापरले आहे. हे मशीन हॅक झाले आहे. हे येत्या आठवड्यात सिद्ध करणार असून महायुती सरकारने रडीचा डाव खेळाला आहे, असे राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे पुणे शहराध्यक्ष प्रशांत जगताप म्हणाले.

### आधी मुख्यमंत्री ठरेल आणि मग मुख्यमंत्री बाकी मंत्री ठरवतील; देवेंद्र फडणवीस यांची माहिती

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी** : तीनही पक्ष मिळून आधी मुख्यमंत्री ठरवतील, त्यानंतर इतर मंत्री ठरवतील, अशी माहिती देत ईव्हीएमवर विरोधकांनी घेतलेल्या आक्षेपावर देवेंद्र फडणवीस टिका केली.



आम्ही तिनही पक्ष आणि आमचे पक्षश्रेष्ठी एकत्र पुढील निर्णय घे वू, आमदार मंत्री पदासाठी इच्छूक, आधी मुख्यमंत्री ठरेल आणि मग मुख्यमंत्री बाकी मंत्री ठरवतील. मुख्यमंत्री जाहीर झाल्यानंतर बाकी मंत्रीपद जाहीर होतील, तर विरोधक ईव्हीएमवर आक्षेप घेत आहेत. मात्र सर्वोच्च न्यायालयाने त्यावर उत्तर दिलेले आहे. तुम्ही हारले की ईव्हीएम वाईट ही पद्धत बंद करा, ईव्हीएम टेम्परप्रूफ आहे. हा रडीचा डाव आहे तो बंद करा, असे सल्लाही भाजपचे ज्येष्ठ नेते तथा आमदार देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांना दिला.

## कन्नड येथील मतमोजणी प्रकरणी अफवांवर कोणी विश्वास ठेवू नये -दिलीप स्वामी

दैनिक आपला विदर्भ



**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी** : कन्नड विधानसभा मतदारसंघातील तळनेर या गावातील मतदार केंद्राच्या बाबतीत मध्ये प्रसार माध्यमावर चुकीचं मतदान मोजणी झालेली आहे अशा पद्धतीच्या बातम्या प्रसारित होत आहेत त्या संदर्भामध्ये आम्ही आयोगाला पण रिपोर्ट पाठवलेला आहे वस्तुस्थिती त्या मतदान केंद्रावरची आकडेवारी दुसऱ्या मतदार केंद्रावरच्या यादीत लिहिली पण प्रत्यक्ष मतमोजणी होताना त्यांच्या कागदावर जे आकडेवारी लिहून घेतलेली आहे ती आकडेवारी परत शेअर करून लिहून देत असताना एका मतदान केंद्राची आकडेवारी दुसऱ्या मतदान केंद्राच्या आकडेवारी मध्ये हाताने लिहून दिली आणि त्याची टोटल जास्तीची झाली आणि प्रत्यक्ष मतमोजणी मध्ये जे कंट्रोल युनिट आहे त्याच्यावरची आकडेवारी आणि ही आकडेवारी मध्ये तफावत आहे अशा पद्धतीचे चित्र उभं केलं होतं परंतु जसं दुसऱ्या दिवशी ही बातमी आमच्या कानावर आली तसं आम्ही निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना सूचना दिली होती. निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी संबंधित उमेदवारांना बोलावून सर्व रेकॉर्ड त्यांना दाखवलेला आहे प्रत्यक्ष मतदान केंद्रावर झालेलं मतदान आणि मतमोजणीच्या वेळेस निघालेले मतदान हे समान आहे त्याच्यामध्ये एकाही मताचा कुठेही तफावत नाही. परंतु मतमोजणी प्रतिनिधींनी लिहिताना काहीतरी गडबड गोंधळ केला आणि स्वतःच्या हस्ताक्षरांमध्ये इकडच्या मतदान केंद्रावरची आकडेवारी दुसऱ्या मतदान केंद्रावर मिक्स केली आणि त्याची गोळा बेरीज करून ते जास्तीच आहे असं काहीतरी समाज माध्यमांमध्ये पसरवलं आणि त्यामुळे लोकांच्या मनामध्ये किंतू परंतु झालं असेल तर मी स्पष्टपणे आपला निर्दर्शनास आणून देऊ लोकांच्या मनामध्ये संभ्रम निर्माण होईल असं वातावरण निर्माण करू नका अशी माझी विनंती आहे.

# प्रदीपजी मिश्रा यांच्या कथा स्थळाची पोलीस उपअधीक्षकांकडून पाहणी

दैनिक आपला विदर्भ

**धुळे/प्रतिनिधी :** प्रसिध्द शिवमहापुराण कथावाचक पंडीत प्रदीपजी मिश्रा यांची दि. १ डीसेंबर ते ७ डिसेंबर दरम्यान करवंद नाका परिसरात शिवपुराण कथा सुरु होणार असून या कथेच्या स्थळाची पाहणी करण्यासाठी पोलीस उपअधीक्षक किशोर काळे पोलीस निरीक्षक जयपाल हिरे व कर्मचारी यांनी भेट देवून आयोजकांना योग्य त्या सुचना दिल्या आहेत. सदर या कथेत दहा लाख भाविक येणार असल्याची माहिती आयोजकांच्या वतीने पोलीस प्रशासनाला देण्यात आली आहे.



शिरपूर येथे १ डिसेंबर पासून सुरू होणाऱ्या शिवमहापुराण कथेसाठी धुळे जिल्ह्यासह राज्यातील अनेक भागातून भक्तमंडळी येणार असल्याची माहिती मिळाल्यानंतर या ठिकाणी येणार कोणत्याही भाविक-भक्तांना गैरसोय होवू नये व येणाऱ्या वाहनांचीही पार्किंग मोकळ्या जागेत करण्यात यावी यासाठी दिशादर्शक बोर्ड लावण्यात आले आहेत. व प्रत्येक ठिकाणी पोलीस कर्मचाऱ्यासह स्वयंसवेकांची नियुक्ती करण्यात आली आहे.

यावेळी पोलीस उपअधीक्षक किशोर काळे यांनी पोलीस कर्मचाऱ्यांसह या ठिकाणच्या स्वयंसेवकांना योग्य त्या सुचना आणि मार्गदर्शन करत कोणत्याही भाविक-भक्तांना गैरसोयीचा सामना करावा लागणार नाही याची दक्षता घेण्यात यावी असे सांगितले. याचेबरोबर जिल्हा प्रशासन आणि पोलीस प्रशासनाने



या ठिकाणी येणाा भाविक-भक्तांना विनंती केली की, कोणत्याही अफवांवर विश्र्वास ठेवू नये. काही गैरवर्तन करत असतांना किंवा संशयीत स्वरुपाच्या वस्तु आढळल्यास जवळील पोलीस कर्मचाऱ्याला व स्वयंसेवकाला याबाबतची माहिती द्यावी अशी विनंती देखील यावेळी करण्यात आली.

## विविध वृत्त...

### शिंदे हेच मुख्यमंत्री पदाचे खरे दावेदार - बच्चू कडू



दैनिक आपला विदर्भ

**अमरावती/प्रतिनिधी :** विधानसभा निवडणुकीत मुस्लिमांचा फतवा व हिंदूंचे कटोंगे तो बटेंगे या सर्व धार्मिक राजकारणात आमचा सेवेचा झेंडा हरला असल्याची प्रतिक्रिया प्रहार जनशक्ती पक्षाचे प्रमुख व माजी आमदार बच्चू कडू यांनी दिली आहे. मतदार संघात प्रचंड काम केले. ६ हजार ७०० कोटींची विकास कामे केली आणि मत मिळाले ६७ हजार. सेवा हरली आणि राजकारण जिंकलं अशी लोकांची प्रतिक्रिया आहे. धार्मिकता, लाडक्या बहिणींचा प्रभाव आणि ईव्हीएम मधील घोटाळा ही पराभवाची प्रमुख कारणे आहे. २९ ला मुंबई येथे सर्व जिल्हाध्यक्षांची बैठक आहे. त्यानंतर २ तारखेला शेगाव येथे अधिवेशन आहे येथे प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक आहे त्यानंतर आम्ही आमची पुढची दिशा ठरवून सत्तेत राहायचे की बाहेर हे ठरवू.

गरज सरो वैद्य मरो हा अजेंडा भाजपने वापरू नये. एकनाथ शिंदे यांनी बंडखोरी केली नसती तर भाजपा सत्तेत आली नसती. तर आज चित्र वेगळे राहिले असते. म्हणून आज ही जी किमिया आली आहे हे एकनाथ शिंदे यांच्या बंडखोरी मुळे आली आहे. मात्र भाजप असे करेल वाटत नाही. एकनाथ शिंदे यांची मुख्यमंत्री पदाची दावेदार एकदम योग्य आहे असे बच्चू कडू म्हणाले.

### देवेंद्र फडणवीस यांची मुख्यमंत्री पदी निवड व्हावी यासाठी भाजपाच्या पदधिकाऱ्यांची गणपती मंदिरात महाआरती





दैनिक आपला विदर्भ

**नंदुरबार/प्रतिनिधी :**महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदी देवेंद्र फडणवीस यांची वर्णी लागावी यासाठी आज नंदुरबार जिल्हा भाजपाच्या वतीने नंदुरबारचे आराध्य दैवत असलेले गणपती मंदिर येथे महाआरती करण्यात आली. भाजपा प्रदेश महामंत्री विजय चौधरी यांच्या हस्ते ही महाआरती करण्यात आली. यावेळी भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत महायुतीला घवघवीत यश मिळाले असून अनेक कल्याणकारी योजनेच्या जोरावर महायुतीने हे यश संपादन केले. या यशात देवेंद्र फडणवीस यांचे मोठे योगदान आहे, त्यामुळे महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदी त्यानां संधी मिळावी असे साकडे आज गणपती भगवानला घालण्यात आले आहे.असे महामंत्री विजय चौधरी यांनी सांगितले.

### राज्यात राष्ट्रपती राजवट लागू करा माजी मंत्री सुबोध सावजी यांचे राज्यपाल राधाकृष्णन यांना निवेदन

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** निवडणुकीनंतर मोठ्या पक्षास सरकार स्थापण करण्यासाठी निमंत्रित करावे, या निमंत्रणास प्रतिसाद न मिळाल्यास आपण राज्यात



राष्ट्रपती राजवट लागू करावी, अशी मागणी माजी मंत्री सुबोध सावजी यांनी महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल सी.पी राधाकृष्णन यांना निवेदनाद्वारे केली आहे. निवेदना नमुद केले आहे की, महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीची प्रक्रिया दि.२३ नोव्हेंबररोजी पूर्ण होऊन पक्षीय बलाबल निश्र्चित झाले आहे. आपण आपल्या अधिकारानुसार संख्येने मोठ्या पक्षास सराकर स्थापन करण्याकरिता निमंत्रित करावे,हा आपला घटनात्मक आधिकार आहे. आपल्या निमंत्रणास प्रतिसाद न मिळाल्यास आपण राज्यात राष्ट्रपती राजवट लागू करावी, राज्याच्या राजकारणात आपण सहभागी न होता निपक्षपातीपणे आपण आपला अधिकार अंमलात आणावा, अशी मागणीही माजी मंत्री सुबोध सावजी यांनी महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

## ॲपलने भारतात बनवले ८४,००० कोटी रुपयांचे आयफोन, अश्विनी वैष्णव म्हणाले – विक्रम झाला

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** भारतात ॲपल यूजर्सची संख्या वाढत आहे, लोक आयफोन खरेदी करण्यात रस दाखवत आहेत. त्यामुळे भारतावर विश्वास दाखवत कंपनीने उत्पादनही वाढवले आहे. आयफोनचे उत्पादन वाढल्याने नवा विक्रम निर्माण झाला आहे. भारत सरकारच्या झडख योजनेमुळे, चालू आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये ॲपलचे उत्पादन १० अब्ज डॉलर्स म्हणजेच सुमारे ८४,००० कोटी रुपयांवर पोहोचले आहे. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव सोशल मीडिया प्लॅटफॉर्म द वर पोस्ट करत आहेत. याबद्दलची माहिती दिली आहे.

केंद्रीय मंत्यांनी आपल्या पोस्टम ध्ये म्हटले आहे की, मागील आर्थिक वर्ष २४ पेक्षा हा आकडा ३७ टक्के अधिक आहे. ते म्हणाले की, गेल्या ७ महिन्यांत १० अब्ज डॉलर्सपैकी ७ अब्ज डॉलर्सचे आयफोन निर्यात करण्यात आले आहेत. त्यांनी हा विक्रम मैलाचा दगड असल्याचे सांगितले आहे. याचा अर्थ असा की उत्पादित वस्तूंपैकी सुमारे ७० टक्के निर्यात केली गेली, तर ३ अब्ज किम तीचे आयफोन देशांतर्गत बाजारात विकले गेले. भारतात अश्रिश साठी ऑक्टोबर २०२४ हा ऐतिहासिक महिना होता, ज्यामध्ये ग्झप्दहा चे उत्पादन प्रथमच एका महिन्यात २ अब्ज पार केले.

केंद्रीय मंत्री म्हणाले की, गेल्या ४ वर्षात ॲपलमध्ये सुमारे १७५,००० लोकांना नोकऱ्या मिळाल्या आहेत आणि मनोरंजक गोष्ट म्हणजे त्यापैकी ७३ टक्के महिला आहेत.

## मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील जंगल सफारीसाठी पर्यटकांची झुंबड!

दैनिक आपला विदर्भ

**अमरावती/प्रतिनिधी :** विदर्भाच्या नंदनवन असलेल्या चिखलदरा पर्यटनस्थळाप्रमाणेच मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या विविध भागात सुरू असलेल्या जंगल सफारी, हत्ती सफारीसाठी पर्यटकांची गर्दी होऊ लागली आहे. मेळघाटात वाघ, बिबट, अस्वल, रानगव्याचे दर्शन पर्यटकांसाठी एक पर्वणी ठरले आहे.

मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या वैराट, सेमाडोह, शहानूर, नरनाळा, बोरी, घारगड, वसाली, सिपना गुगामल व अकोट वन्यजीव विभागांतर्गत येणाऱ्या जंगल सफारीसह कोलकास येथील हत्ती सफारीला मोठ्या प्रमाणात पर्यटकांचा प्रतिसाद मिळू लागला आहे. दरम्यान मेळघाटचा स्वर्ग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कोलकास येथे व्याघ्र प्रकल्पाच्या वतीने २० ऑक्टोबरपासून हत्ती सफारी सुरू झाली असून मोठ्या प्रमाणात पर्यटक मेळघाटकडे आकर्षिले जात आहेत.

हत्ती सफारी खास आकर्षण

बच्चेकंपनीसाठी पर्वणी असलेली हत्ती सफारी खास आकर्षण ठरले आहे. चिखलदरा पर्यटनासह सेमाडोह येथे जंगल सफारीसाठी जिप्सी असून, मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या सिपना व गुगामल वन्यजीव विभागांतर्गत असलेल्या वैराट, सेमाडोह, कुवापाटी आदी जंगलात हीजंगल सफारी पर्यटकांना आकर्षणाचे केंद्र ठरली आहे. विविध वन्यप्राणी, पशु-पक्षी यांचे खास आकर्षण असले तरी मोठ्या प्रमाणात आता पर्यटकांना या प्राण्यांचे दर्शन होऊ लागले आहे. घनदाट अरण्यात होणारी जंगल सफारी सुरू झाली. सफारीसाठी चार हत्ती तैनात आहेत.

मेळघाटच्या राजासह बिबटे, सांबराचे दर्शन

जंगल सफारीदरम्यान पर्यटकांना हमखास वाघ, बिबट, अस्वल, रानगवा, सांबर, हरिण, मोर तसेच विविध पक्षी-प्राण्यांचे दर्शन होत आहे. नरनाळा, शहानूर जंगल सफारी दरम्यान विविध प्राण्यांचे झालेले दर्शन पर्यटकांनी कथन केले. तसेच सेमाडोह जंगल सफारीतही विविध वन्य जिवांसह वाघाचे दर्शन पर्यटकांना होत असल्याची माहिती वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांनी दिली.

## साईबाबा संस्थानवर नव्याने विश्वस्त मंडळ येणार

### राज्यमंत्रिपदाचा दर्जा असलेल्या साई संस्थानच्या अध्यक्षपदी कोणाची वर्णी?

दैनिक आपला विदर्भ

**शिर्डी/प्रतिनिधी :**राज्याचा मुख्यमंत्री कोण होणार याकडे सर्वांचेच लक्ष लागून राहिलेलं असतानाच देशातील नंबर दोनचे श्रीमंत देवस्थान असलेल्या शिर्डी साईबाबा संस्थानवर विश्वस्त मंडळ येणार का ? याचीही उत्सुकता सगळ्यांना लागलीय. राज्यात आता भाजपा महायुतीचे सरकार आल्याने साई संस्थानच्या अध्यक्षपदाची माळ कोणाच्या गळ्यात पडणार याकडे सर्वांचे डोळे लागून राहिले आहेत.

साई संस्थानाच्या स्थापनेला १०० वर्षे पूर्ण : श्रद्धा अन् सबुरीचा मंत्र देणाऱ्या शिर्डीतील साईबाबांच्या साई संस्थानाच्या स्थापनेला १०० वर्षे पूर्ण झालीत. दरम्यान २०१२ ते २०२४ या १२ वर्षांच्या कालावधीत २०१८ शताब्दी वर्षात भाजपा-सेना युतीच्या सरकारमध्ये तत्कालीन अध्यक्ष सुरेश हावरे यांना विश्वस्त मंडळाचा जेमतेम ३ वर्ष कारभार चालवता आलाय. तसेच २०२१ मध्ये महाविकास आघाडी सरकारमध्ये कोपरगावचे आमदार आशुतोष काळे यांच्या नेतृत्वात विश्वस्त मंडळाला दीड वर्ष काम करता आलेलं आहे. त्यामुळे त्यांना पुरेसा वेळ मिळालेला नाही.



साईबाबा संस्थानचा कारभार त्रिसदस्य समिती संस्थानकडे : सुरेश हावरे यांच्या कार्यकाळात मोठ-मोठ्या घोषणा झाल्या, परंतु त्या सत्यात उतरल्याचे आतापर्यंत दिसून आलेलं नाही. दोन्ही विश्वस्त मंडळाचा हा चार-साडेचार वर्षांचा कालावधी वगळला तर आतापर्यंत साईबाबा संस्थानचा कारभार त्रिसदस्य समिती संस्थान पाहत आहे. राज्यात नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीत भाजपा, राष्ट्रवादी, शिवसेना महायुतीला जनतेने भरभरून मते देऊन सत्तेत महायुतीचे सरकार आणलंय. मागील अडीच वर्षांच्या कालखंडात महायुती सरकार असताना साई संस्थानवर विश्वस्त मंडळाची नियुक्ती होणे अपेक्षित होते. मात्र तसे काही झाले नाही. त्याबरोबरच एसटी महामंडळ वगळता इतर महामंडळावर ही नव्याने निवड झालेली नाही. त्यामुळे आंतरराष्ट्रीय तीर्थक्षेत्र असलेल्या शिर्डी येथील साईबाबा संस्थानवर कोणाची वर्णी लागते हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

विश्वस्त मंडळात एकूण १५ सदस्य : वर्ष १९२२ साली साई संस्थान स्थापनेवेळी विश्वस्त मंडळात एकूण १५ सदस्य होते. तर भक्त मंडळात २३२ सदस्यांचा समावेश होता. त्यावेळी संस्थानकडे स्थापनेवेळी केवळ २ हजार २३८ रुपये होते. आज मात्र १०० वर्षात २ हजार २०० कोटींहून अधिक ठेवी आहेत, तसेच ४५० किलो सोने, साडेपाच हजार किलो चांदी, तर १० कोटींचे मौल्यवान हिरे एवढी संपत्ती आहे. आता राज्यात स्थिर सरकार आल्याने साई संस्थानवर प्रलंबित असलेल्या विश्वस्त मंडळाचा तिढा सुटेल, असा विश्वास शिर्डी ग्राम स्थांकडून व्यक्त करण्यात आलाय.

## १४ मित्रांची निघृण हत्या, ३६ वर्षीय महिला का झाली सीरियल किलर ?

**मुंबई/प्रतिनिधी :** असे म्हणतात की मैत्री हे असे नाते असते ज्यामध्ये लोक सर्वस्वाचा त्याग करायला तयार असतात. पण तुमचा मित्र तुमच्या जीवाचा शत्रू झाला तर? अशीच एक धक्कादायक आणि हृदय पिळवटून टाकणारी घटना थायलंडमधून समोर आली आहे, जिथे एका ३६ वर्षीय महिलेने आपल्याच १४ मित्रांची हत्या केली. किंबहुना, एका महिलेच्या व्यसनाने तिच्यावर एवढा जबरदस्त परिणाम केला की, स्वत:ला या दलदलीतून बाहेर काढण्यासाठी ती आपल्याच मित्रांची शत्रू बनली. आता जाणून घेऊया काय घडले की एक महिला का बनली सीरियल किलर.

साारत रंगसिवुथापोर्न नावाच्या या थायलंड महिलेला मिस सायनाइड असे नाव देण्यात आले आहे. तिच्यावर १४ मित्रांचा छळ करून हत्या केल्याचा आरोप आहे. स्थानिक मीडिया रिपोर्ट्सनुसार, तिला मित्राच्या हत्येप्रकरणी फाशीची शिक्षा सुनावण्यात आली आहे.

## दोन अट्टल चोर शहर पोलिसांच्या जाळ्यात; पाच लाखाचा मुद्देमाल जप्त

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** खामगाव शहर पोलिस स्टेशनचे कर्मचारी नांदुरा रस्त्यावर पेट्रोलिंक करत असताना त्यांना स्टेट बँक एडीबी शाखेसमोर दोन इसम दुचाकी वर बसून संशयास्पद हालचाली करताना दिसून आले. पोलिसांनी त्यांची कसून चौकशी केली असता ते बाहेर राज्यातील अट्टल चोर असल्याची माहिती समोर आली. त्यांनी आपली नावे पप्पुराम अर्जुनलाल जाट व राजू बालू जाट दोघेही रहाणार जिल्हा भिलवाडा,राजस्थान असल्याचे पोलिसांना सांगितले. हे दोघे बनावट सोने विक्री करून लोकांची फसवणुक करणारे व एटीएम कार्डचे हेराफेरी करणारे अट्टल चोर असून त्यांच्या विरूध्द गुजरात व राजस्थान मधील पोस्टे मध्ये चोरी व फसवणुकीचे विविध गुन्हे दाखल आहेत. तर या दोघांनी अकोला येथे एका इसमाची ४० हजाराने फसवणुक केल्याचा गुन्हा केला असल्याची कबुली दिली.





पोलिसांनी दोघांना अटक करून त्यांच्या जवळून नगदी ९० हजार, सोन्या चांदीचे दागिने व दुचाकी सह एकूण ५ लाख २ हजार ५६८ रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. अशा गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांपासून नागरिकांनी सावध राहावे असे आवाहनही यावेळी करण्यात आले आहे.ही कारवाई पोलिस अधीक्षक विश्व पानसरे, एएसपी अशोक थोरात, एसडीपीओ विनोद ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणेदार रामकृष्ण पवार यांच्या आदेशान्वये एपीआय भागवत मुळीक, पोहेकाँ. गजानन बोरसे, पोना सागर भगत, पोकाँ. रविंद्र कन्नर, पोकाँ. गणेश कोल्हे, पोकाँ. राहुल थारकर , पोकाँ. अमरदिपसिंह ठाकूर व पोकाँ. अंकुश गुरूदेव यांनी केली.